

# सावळ्या

## मुलीची गाणी

तुषार जोशी
नागपूर

साहित्य प्रतिष्ठान


# सावळ्या मुलीची गाणी.........

सावळा आणि काळा हे दोन स्वतंत्र रंग आहेत, आणिक गोऱ्या रंगाचा अभाव म्हणजे सावळे असणे नाही, असे मानणाऱ्यांमधला मी एक. जगात जसे काही लोकांना गोरा रंग आवडतो तसेच काही लोकांना सावळा रंग आणि काही लोकांना काळा रंग आवडतो हे मी अनुभवले आहे. सावळा रंग आवडणाऱ्यामधला मी एक आहे. गोरा रंग आवडणारे त्याची आवड सांगताना दिसतात गोरी गोरी पान सारखे वाक्यप्रयोग पण कवितेत आणि गाण्यात लिहिले जातात, तसे सावळा रंग आवडणारे पण करु शकतात हे सुचल्याबरोबर मी माझी आवड शब्दबद्ध करायचे ठरवले.

मी एक साधारण माणूस आहे आणि मला जे आवडते तसेच आवडणारे जगात अनेक असणार याची मला खात्री आहे. गोरा रंग छान म्हटला म्हणजे सावळा रंग कमीपणाचा होत नाही हे तत्व काही लोक विसरतात आणि मग रंगांमध्ये भेद सुरु होतो. पण सावळ्या रंगावर जिवापाड प्रेम करणारे आणि तोच हवा असे म्हणणारे लोक पण त्याचबरोबर जगात आहेत हे माझे सत्य प्रकर्षाने मांडणे हे मला करता येईल हे सुचताच मी ते या गाण्यांच्या माध्यमातुन करतो आहे.

जे जन्मताच मिळालेले आहे ते निकृष्ट कसे असू शकते? ते सुंदरच असणार. पण सतत प्रसिद्धी माध्यमांमध्ये दिसणाऱ्या भुलाव्याला भूलून आपलेच सत्य कधी कधी निकृष्ट वाटायला लागते, ती मरगळ झटकून टाकण्यासाठी हे शब्द मी लिहून ठेवतो आहे. राजहंस जोवर बदकांशी तुलना करण्यात मग्न असतो तोपर्यंतच त्याची तगमग सुरु असते, ज्या क्षणी त्याला त्याच्या वेगळ्या अस्तित्वाची जाणीव होते तेव्हा सगळे प्रश्न मिटतात. सावळा रंग जर स्वतःला गोरेपणाचा अभाव समजू लागला आणि मलूल झाला तर माझ्यासारख्या सावळ्या रंगाच्या चाहत्यांना ते कधीही आवडणार नाही. म्हणूनच त्या माझ्या आवडत्या सावळ्या रंगासाठी ही सावळ्या मुलीची गाणी.

“तुषार जोशी, नागपुर”



# !! तुझ्या रंगाचा गोडवा !!

काय आवडले सांगू?
काळा सावळा तो रंग
तुझ्या रंगाने नादला
माझ्या हृदयाचा मृदंग

जरी डोळे ते टपोरे
दाट केसांचा भुलावा
आग्रहाने सांगू दे गं
तुझ्या रंगाचा गोडवा

काळ्या सावळ्या रंगाची
ओढ मला जीवघेणी
आलीस तू जीवनात
धुंद सौंदर्य होऊनी



# !! अनवट माया !!

काळ्या सावळ्या मुलीची
आहे अनवट माया
काळ्या रेशमी केसांची
कशी घनदाट छाया ।। ध्रु ।।

शुभ्र मोगऱ्याच्या मुळे
केसांमध्ये फुले,
सुगंधी उत्सव
कानामध्ये मोती डुले
किती मोहमयी,
असावे वास्तव
तिला भेटण्या आधीचा
सारा जन्म गेला वाया ।। १ ।।

स्मित हळुवार धुंद
कसा चहुकडे,
प्रकाश पसरे
चंद्रबिंदी बघताना
बघणारा भान,
सगळे विसरे
फ़क्त आठवाने तिच्या
माझी रोमांचित काया ।। २ ।।



# !! सांगू कसे तुला मी !!



ए सावळ्या मुली गं
सांगू कसे तुला मी
माझाच मी न उरलो
झालो पुरा तुझा मी ।। ध्रु ।।

स्वप्नात मी तुझ्याशी
गोष्टी कितीक करतो
येता तुझ्या समोरी
पुन्हा मुकाच ठरतो
ही ओढ जीवघेणी
झुरतो तुझ्या विना मी ।। १ ।।

जादू तुझ्या छटांची
घायाळ रोज करते
मी टाळतो तरीही
मन आठवांत फ़िरते
आता तुझ्याचसाठी
वेडापिसा खुळा मी ।। २ ।।

स्वप्नात पाहिलेले
सत्यातही घडावे
जगणे तुझे नि माझे
बघ एकरूप व्हावे
जगणे तुझ्याविना गं
जगणे न मानतो मी ।। ३ ।।



# !! सखी गं !!

तुझे काळे काळे रूप
मला आवडते ख़ूप
तुझ्या रंगात साठली गुंगी गूढ
सखी गं सखी गं सखी गं

तुझ्या रुपाचा प्रभाव
जाणवतो चारी ठाव
काळया सावळया रंगास किती ओढ
सखी गं सखी गं सखी गं

तुझे असणे केवळ
करी जगणे प्रेमळ
तुझे नसताना आयुष्य अगोड
सखी गं सखी गं सखी गं

तुझे बोलणे लाघवी
रोमारोमात पालवी
तुझे लाजणे जिवास लावी वेड
सखी गं सखी गं सखी गं



# !! गेय कविता !!

ती सावळी मुलगी माझे
काळीज घेऊन गेलेली
जगतो आहे तालामध्ये
जगण्याला लय आलेली ।। धृ।।

ती म्हणाली ज्या क्षणी
की सवय झाली तुझी
चोहीकडे संगीत वाजू लागले
माझ्या सगळ्या चिंता
माझी सगळी शल्ये
सगळी पळून गेलेली ।।१।।

भाव जागू लागले
शब्द नाचू लागले
कवितेत माझ्या अर्थ दाटू लागले
साधासा धडा होतो
आता माझ्या  जगण्याची
गेय कविता झालेली ।।२।।

टेकते छातीवरती
चेहरा विश्वासुनी
वाटे मी राजा विश्व माझे जाहले
जगही जिंकेन मी
काहीही करेन मी
शक्ती अशी मिळालेली ।।३।।





सावळ्या
मुलीची गाणी

तुषार जोशी - नागपूर



# सावळ्या

मुलीची गाणी

तुषार जोशी - नागपूर

# !! एक सावळी ती परी !!



स्वप्नात ती दिसावी मिटताच डोळे
दिवसा तिचे व्हावे आभास भोळे
दिवसा तिचे व्हावे आभास भोळे
एक सावळी ती परी , मनमोहिनी सावरी
मनमोहिनी सावरी, एक सावळी ती परी ।। धृ।।

रंग़ास तोड नाही ,रूपास तोड नाही
शब्दच अपुरे पडती, पडती अपुरे
सागर तिच्या रूपाने, माझ्या समोर येई
सगळे किनारे भिजती, भिजती किनारे
हसताच ती प्रभेने दिपतात डोळे
विणतो सुगंध अंगी रोमांच जाळे
विणतो सुगंध अंगी रोमांच जाळे
एक सावळी ती परी , मनमोहिनी सावरी
मनमोहिनी सावरी, एक सावळी ती परी ।।१।।

कुरळ्या तिच्या बटांना, देता ती एक झटका
अडतो तिथेच श्वास, अडतोच श्वास
बघते ती ज्या कुणाला, त्याची असे दिवाळी
खासच जातो दिन तो, जातोच खास
बुडतो सहज कुणीही गहिरे ते डोळे
स्मरणात तिचीया जगणे  जगणे निराळे
स्मरणात तिचीया जगणे  जगणे निराळे
एक सावळी ती परी , मनमोहिनी सावरी
मनमोहिनी सावरी, एक सावळी ती परी ।।२।।



# !! सावळी अबोली !!



सल एकटेपणाची, गेली पळून गेली
ती सावळी अबोली, हृदयात आज आली ।।धृ।।
ती सावळी निराळी, वळताच हासते ती
दिवसाच चांदण्याची, बरसात मांडते ती
कामामधील चित्त, घेऊन ती उडाली
ती सावळी अबोली, हृदयात आज आली ।।१।।

म्हणते न शब्द काही, डोळेच बोलतात
विरहाचे कण तिलाही, दिनरात बोचतात
वा काय कल्पना ही, आली सुगंधलेली
ती सावळी अबोली, हृदयात आज आली ।।२।।

धडधड सुरुच राही, हृदयात जोरदार
ते प्रीत ज्यास म्हणती, हा काय तो प्रकार?
माझी नविन ओळख, मजलाच आज आली
ती सावळी अबोली, हृदयात आज आली ।।३।।



# !! सावळे असणे स्वयंभू !!

दु:ख सारे शांत व्हावे शल्य सारे मावळावे, हिच साधी
भावना या सावळ्या रंगात आहे
तो विधाता गात होता गोड गाणे त्या क्षणाची, भाववेडी
कल्पना या सावळ्या रंगात आहे

मोगऱ्याला का गुलाबाचा कधीही राग येतो, सावळा
गोरा कशाला भेद जगती नित्य होतो
जे कुणी म्हणतात गोरे चांगले कसले अडाणी,
राजहंसी वेदना या सावळ्या रंगात आहे

केस काळे लांब वेणी स्मित गाली पांघरोनी वागणे
साधे प्रभावी तु गुणांची खाण अवघी
पण तुझ्या या सावळ्या रंगात आहे खास जादू, काय
जादू सांगना या सावळ्या रंगात आहे

पान गोरी छान गोरी ऐकुनी येते उदासी शोधते काही
रसायन जे तनूला शुभ्र करती
सावळ्या रंगात गोडी सांगते कोणी तिला ना, का अशी
अवहेलना या सावळ्या रंगात आहे

सावळे असणे स्वयंभू शुभ्र नसणे सावळे ना
माणसाला लाभलेला दागिना हा जन्मताना
सावळ्या रंगास लाभे तेज चंद्राचे उन्हाचे, मानभावी
चेतना या सावळ्या रंगात आहे




तुषार जोशी - नागपूर

# !! सावळी तू !!

भावनांचा
मोक्षबिंदू
वीज जैशी
वादळी तू
सावळी तू

स्मित माझे
गीत माझे
या मनाच्या
राऊळी तू
सावळी तू

भास नाही
तूच ती तू
पाहतो त्या
त्या स्थळी तू
सावळी तू

शब्द माझे
भाव माझे
झेलणारी
वेंधळी तू
सावळी तू

ज्योत माझी
तेवतांना
काळजीची
ओंजळी तू
सावळी तू






तुषार जोशी - नागपूर

# !! तुझा सावळा शृंगार !!

तुझा सावळा शृंगार
जीव जाहला अंगार
किती रुतते रुतते
तुझ्या नजरेची धार

असे पाहू नको वेडे
जीव वितळतो माझा
तुझी ओढ काळजात
घेऊ लागली आकार

आता पाठीमागे सारे
बोल बोलतील मला
काय जाहले हो याला?
अहो गुणी होता फार

कसे सोसतो सोसतो
तुझ्या असण्याचे तेज
तुटे इतकी नादते
मन कोवळी सतार

घनघोर बरसतो
आता सुखाचा पाऊस
तुझा आठव मल्हार
तुझा विचार मल्हार




तुषार जोशी - नागपूर

# फेयर अँड लव्हली आणून देना बाबा मला

टिव्ही मधे दाखवती गोरे गोरे रंग
क्रिम कोणते मी लावू गोरे होण्या अंग
मला पण हवा माझा चेहरा चांगला
फेयर अँड लव्हली आणून देना बाबा मला

तुझा आहे तोच रंग गोड आहे बेटा
रंग बदलण्याचा नको गं आटापिटा
रंग जो मिळाला जन्मताना आपल्याला
तोच रंग छान रंग तोपण चांगला
बागेमधे मोगऱ्याची फुले असती ना
गुलाबाची पण असतात काय हो ना
गुलाबाने मोगरा व्हायचे नसते गं
गुलाबाचे वेगळे सौंदर्य असते गं
आवडतेस तू आहे तशीच आम्हाला
रंग गोरा करण्याचा विचार कशाला

जाहिरात दाखवावी लागतेच त्यांना
खोटी स्वप्ने विकायची असतात ज्यांना
गोरे छान काळे घाण म्हणावे लागते
पून्हा पुन्हा तेच तेच सांगावे लागते
जगामधे सावळेसे बघ किती लोक
गोरे तर थोडे काळे सावळे अधिक
बदकांच्या सौदर्याची व्याख्या ही वेगळी
चिमणीने तुलनाच करू नाही मुळी
सावळ्या रंगाची गोड गुणाची देखणी
तू आमुची अलौकिक सावळी चिमणी

सावळ्या रंगाचा पोरी अभिमान ठेव
त्याला आवडते तेच बनवतो देव
रंग गोरा रंग काळा आणिक सावळा
सगळेच त्याने बनवले हो ना बाळा?
सगळेच रंग छान असतात बघ
कुणाचाही करू नये द्वेष किंवा राग
लक्ष देऊ नये जर चिडवले कोणी
आपल्याच तालामधे म्हणायची गाणी
कितीतरी लोक पुढे भेटतील तुला
भाळतील बघ तुझ्या सावळ्या रंगाला




तुषार जोशी - नागपूर

प्रकाशक आणि वितरक

# ई साहित्य प्रतिष्ठान



ई साहित्य प्रतिष्ठान आपल्यासाठी नवनवीन ई बुक्स सातत्याने प्रकाशित करत असते. आमच्या विनामूल्य ई बुक्स साठी ताबडतोब नोंदणी करा. esahity@gmail.com ला फ़क्त एक शब्दाची मेल करा. “नोंदणी करा” अशी. बस्स. आणि यावर्षातली ई पुस्तकांची सिरीज आपल्या मेल इन बॉक्स मध्ये धडाधड येऊन पडेल बघा! पहिला येईल त्याला पहिलं पुस्तक. या शिवाय आमची नेटाक्षरी वगैरे नियतकालिकं असतातच. दर आठवड्याला आमची नवनवीन विषयाला वाहिलेली ई साप्ताहिकं येतीलच. तीही पूर्णतः विनामूल्य. मराठी भाषेत एक वादळी झंझावाताने प्रवेश केला आहे. ’काव्यांजली’ , ’मराठी कविता आदी चाळिसहजारहून अधिक सभासद संख्या असलेल्या कम्म्युनिटीजच्या सदस्यांनी चालवलेलं हे जबरदस्त व्यासपीठ आपल्याला प्रेमाचं आमंत्रण देतं आहे. हे पुस्तक कसं वाटलं हे आम्हाला esahity@gmail.com या पत्त्यावर कळवा. या पुढली आणि आधीची दर्जेदार प्रकाशनं आपल्याला विनामुल्य मिळण्यासाठी याच esahity@gmail.com वर रजिस्टर करू शकता. ई साहित्य प्रतिष्ठानची साप्ताहिक नेटाक्षरी, स्वरनेटाक्षरी, काव्यांजली दिवाळी अंक आदी प्रकाशनं सातत्याने सुरूच असतात. सुमारे ५०००० लोकांपर्यंत पोहोचणारी ही प्रकाशनं आहेत. लवकरच ही वाचक संख्या १ लाखावर नेण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. आणि त्याने आमचं समाधान नाही. प्रत्येक मराठी ई मेल धारक, इंटरनेटला जोडलेला प्रत्येक मराठी माणूस आमच्या या चळवळीत जोडला जावा हा आमचा ध्यास आहे. मराठी साहित्य नव्या ई युगात सर्वोच्च स्थानावर जावं, मराठीच्या अभिव्यक्तीची ताकद जगभर पसरलेल्या नव्या पिढीला जाणवावी हा आमचा उद्देश आहे.

www.esahity.com



प्रकाशक आणि वितरक

ई साहित्य प्रतिष्ठान

नवीन मराठी साहित्यिकांना व्यक्त होण्यासाठी एक नवीन व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न आहे. आपण या नवीन ई साहित्य यज्ञात सामिल व्हावं असा आमचा आग्रह असतो. ई बुक्स हे साहित्याचं भविष्य आहे. इंग्रजीत पाच लाखाहून अधिक ई बुक्स आहेत. तर मराठीत शंभराच्या आत बाहेर. हे चित्र बदलायचंय. यासाठी आपण आमच्याशी संपर्क साधावा. कळावे लोभ असावा.

**आपला निमंत्रक**

**ई-साहित्य प्रतिष्ठान**
**esahity@gmail.com**
**9869674820**

ई-साहित्य प्रतिष्ठानची इतर विनामूल्य ई-साप्ताहिके
ई-स्टाप, स्वरनेटाक्षरी ऑडियो अल्बम, बालनेटाक्षरी

--------

प्रसिद्ध झालेली ई-बुक्स

टल्लीची शाळा
मकरंदच्या त्रिवेण्या
ग्रेव्हयार्ड लिटरेचर
चार क्षण
तो आणि ती
प्रियेचे अभंग
देशी दारूचे दुकान-3D
ई-शाळा
तो, मी आणि सिगरेट
लोकल गोष्टी
मोरया
मीरा (अनुवाद)
ऑथंब

मुखपृष्ठ डिझाईन, मांडणी व सजावट

भारती सरमळकर
Last Bench Designs
(where creativity begins)
bharatisarmalkar@gmail.com

www.esahity.com